# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/11/2022 (गुरूवार) सकाळ

---

## घरफोडी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील तारसा येथे दिनांक ०९/११/२०२२ चे १०.०० वा. ते १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. कलाबाई कन्हैयालाल मोरे, वय ५७ वर्ष, रा. तारसा ही दिनांक ०९/११/२०२२ रोजी १०.०० वा. दरम्यान व तिचा पती दोघेही हे घराला कुलुप लावुन शेतात मिरची तोडण्याकरीता गेले होते. सायंकाळी कामावरुन घरी परत आले असता तेव्हा त्यांना घराचे दार उघडे दिसले. त्यांनी घराच्या आत प्रवेश केले असता स्वयंपाक खोलीतील दोन टिनाच्या पेटीचे कुलुप तुटलेले दिसले. लोखंडी पेटीमध्ये ठेवलेले नगदी ५०,०००/— रु. व प्लास्टीकच्या डबीतील फिर्यादीच्या लग्नात आलेली ०५ ग्रॅम ची गळयातील गरसोळी किमंती अंदाजे ५०००/—रु. असा एकुण किमती ५५,०००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.

**२) पो.स्टे. खापा** :— अंतर्गत मच्छी मार्केट खापा येथे दिनांक ०९/११/२०२२ चे ०४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— रामेश्वर उकंडराव अंतूरकर, वय ४५ वर्ष, रा. मच्छी मार्केट, खापा ही दिनांक ०९/११/२०२२ रोजी ०४.३० वा.दरम्यान हे आपल्या घराच्या दाराला कुलुप लावून गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने त्याचे घरातील समोरील दवाजाचा कूलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी कपाटामधून ०१ ग्रॅम सोन्याची पोत असलेली, ०४ ग्रॅमचे पदक व ४.५ ग्रॅमचे पीटीओ ९६ नग असे एकूण ८.५ ग्रॅमचे वजनाचे किमंती अंदाजे २०,०००/—रू., सोनकळी पदक असलेली पोत ज्यामध्ये सोन्याचे सिताफळी डिजाईनचे ०३ ग्रॅम वजनाचे किमंती अंदाजे ९०००/— रू., कानातील ०३ ग्रॅमचे सोन्याच्या बिऱ्या किमंती अंदाजे ९०००/—रू., सोन्याचा मुखडा व नथनी मोर डीजाईनचा १.५ ग्रॅम वजनाचा अंदाजे किमंती ४५००/— रू, चांदीच्या पायपट्टया ०९ ग्रॅम वजनाचे किमंती अंदाजे ३०००/— रू., नगदी २८०००/— रू. असा एकुण किमंती ७३,५००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन खापा करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर